# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०७/२०१८

**१) संगनमत करून विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन पैश्याची मागनी केल्याने गुन्हा नोंद–**

सन २०१५ ते आज पावे तो यातील फिर्यादीस ग्रामपंचायत निवडणुकीत ऊभे करून तिला तिचे वडीलाचे घरून १,००,०००/रु. आण असे बोलुन यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास देत असल्याने महीला समुपदेशन केंद्र तुमसर यांचे अहवालावरून व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४९८ (अ),३४ भादवी. पुढील तपास पोना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून अनाधीकृतपणे घरात प्रवेश करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक १२/०७/२०१८ १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे त्याची लहान मुलगी ही घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून अनाधीकृतपणे फिर्यादीचे घरात प्रवेश करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीस मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३,४५२,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु : –**

दिनांक १२/०७/०१८ चे ०८.०० ते ०८.१५ वाजता दरम्यान यातील मृतक अमोल गोपीचंद खेत्रे वय ३० वर्ष रा. मोहदुरा हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ०८६४ ने पोहरा लाखनी येथुन येत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्स भंडारा कडुन लाखनी कडे एनएच ६ रोडने जात असता भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मृतकचे मोटार सायकलला समोरून धडक मारून त्याचे जागीच मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी शिवचंद नामदेव खेत्रे वय ४६ वर्ष रा. मोहदुरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४ (अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी व एकाचा मृत्यु: –**

दिनांक १२/०७/०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुभाष मोहन पचारे वय ३५ वर्ष रा. अडयाळ हा त्याचे मित्र मनोहर दुर्योधन मेश्राम याचे मोटार सायकल क्र. एमएच ३१ सी क्यु १५८० वर मागे बसुन पवनी रूयाळ येथे जात असतांना समोरून येणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकलला भरधाव वेगाने व निष्काळीपणे चालवुन समोरून राज्य मार्ग क्र. २७१ पवनी ते भंडारा ग्राम रूयाळ दंत मंदीर येथे धडक दिल्याने मनोहर मेश्राम, रोहीत मोटघरे यांना गंभिर जखमी होण्यास व मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने पो.स्टे. पाचपावली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरून पो.स्टे पवनी येथे मर्ग क्र. ३५/१८ कलम १७४ जाफौ.चे चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. मस्के यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) पैश्याचे कारणा वरून भांडण करून चहाचे कप कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १२/०७/०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे कटींग सेवींग दुकानात ग्राहकांची सेविंग कटींग करून गावातील कांचन गिदमारे यांचे चहा टपरीवर जावुन खर्रा घेत असता माझे सेवींग कटींगचे एक वर्षा पासुन पैसे दिले नाही केव्हा देनार असे आरोपीला हटकले असता त्याने त्याचे चहाचे कप फिर्यादीचे डावे बाजुचे कपाळावर मारून जखमी केल्याने फिर्यादी सुभाष सोंविदा शिवनकर वय ३६ वर्ष रा. न्याहारवानी यांचे बयान व डॉ. परीक्षण अहवाला वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**६) शिवीगाळ करून उजव्या हाताचा चावा घेतल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १२/०७/०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा कांचन गिदमारे यांचे चहा टपरीवर चहा पित असतांनी यातील आरोपी हा तेथे येवुन फिर्यादीला पाहुन शिवीगाळ करीत होता तेव्हा फिर्यादीने 'तु मला कशाला शिवीगाळ करते' म्हणुन हटकले असता आरोपीने फिर्यादीचे उजवे हात पकडुन उजवे हाताला चावा घेतला अशा फिर्यादी नाना उर्फ ज्ञानेश्वर पांडुरंग गिधमारे वय ३५ वर्ष रा. इसापुर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**७) विज अंगावर पडुन एक महिलेचा मृत्यु व पाच जखमीः –**

दिनांक १२/०७/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. रेखा प्रभाकर पिंपळशेंडे वय वर्ष ५२ रा. रेंगेपार कोटा ही मजुर बाया शेतात रोहणा लावत असतांना अचानक विजेचा गरगराड होवुन विज मृतकचे अंगावर पडल्याने जागीच मरण पावली आहे व इतर पाच मजुर बाया जखमी झाल्या आहेत असे फिर्यादी आंनद प्रभाकर पिंपळ शेंडे वय २५ वर्ष रा. रेंगेपार कोटा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०७/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स वाहन ही दावाखाना चौक गोबरवाही येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पोलीस स्टेशन गोरवाही करीत आहेत.

**९) अवैध जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन साकोली येथे अवैध जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून जुगारातुन किंमती ८०/–रु.माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०४ ईतर वाहनांवरती – ८३ केसेस करण्यात आले आहे.

१३/७

(वाय.एस.सोलसे)
प्रभरी पोलीस उपअधीक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ७०३८०४६३९९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.